भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# औषधिद्रव्ये (नियंत्रण) अधिनियम, १९५०

(१९५० चा अधिनियम क्रमांक २६)

[३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Drugs Control Act, 1950

**(Act No. 26 of 1950)**

[As in force on the 31st August 1995]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९६

[किंमत : रु.        ]

[किंमत रु. ४-००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला ड्रग्स (कंट्रोल) अ‍ॅक्ट, १९५० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक ३, दिनांक ७ डिसेंबर १९९५ यात पृष्ठ १९० ते १९३ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ७ डिसेंबर १९९५.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Drugs (Control) Act, 1950 as on the 31st August 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 6, dated 7th December 1995 on pages 190 to 193.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated the 7th December 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India

एच ४१७७—१

[किंमत रु. ४–००]

## विशोधन अधिनियम व आदेश यांची सूची

१. ' विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ '.

२. ' निरसन व विशोधन अधिनियम, १९५७ '.

३. १९६२ चा अधिनियम २१.

# औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५०

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. निर्वचन.

३. ह्या अधिनियम कोणत्या औषधिद्रव्यांना लागू आहे.

४. औषधिद्रव्यांच्या कमाल किंमती आणि ज्या प्रमाणात ती ताब्यात ठेवता येतील किंवा विकता येतील ते प्रमाण निश्चित करणे.

५. जेव्हा कलम ४ खाली कमाल मर्यादा निश्चित झालेली असेल तेव्हा विक्री इत्यादींवरील निर्बन्ध.

६. कोणत्याही एका वेळी औषधिद्रव्य ज्या ठराविक प्रमाणात जवळ बाळगता येईल त्यावरील सर्वसाधारण मर्यादा.

७. जवळ बाळगलेल्या मालाचा जादा साठा जाहीर करण्याचे कर्तव्य.

८. विकत देण्यास नकार देणे.

९. विवक्षित विक्रीव्यवहारांचे रोख वसुली टिप्पण द्यावयाचे.

१०. किंमती दर्शविणे आणि किंमती व मालाचे साठे यांची सूची प्रदर्शित करणे.

११. संमिश्र दैकाराच्या बाबतीत किंमत स्वतंत्रपणे नमूद करण्याचे आबंधन.

१२. औषधिद्रव्यांची विल्हेवाट करण्यास मनाई किंवा त्याबाबत विनियमन.

१३. शिक्षा.

१४. निगमांनी केलेले गुन्हे.

१५. प्रक्रिया.

१६. झडती व अभिग्रहण करण्याच्या शक्ती.

१७. नियम करण्याची शक्ती.

१८. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

१९. अन्य कायद्यांची व्यावृत्ती.

शब्दसूची.—इंग्रजी–मराठी.

मराठी–इंग्रजी.

# औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५०[१]

## (१९५० चा अधिनियम क्रमांक २६)

(३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान) [७ एप्रिल, १९५०]

**औषधिद्रव्यांची विक्री, पुरवठा आणि वितरण यांच्या नियंत्रणाचा उपबंध करण्यासाठी अधिनियम**

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमास 'औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५०' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [२][१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग ग राज्यांमध्ये समाविष्ट होती त्या राज्यक्षेत्रांवर] आहे.

निर्वचन.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "व्यापारी" याचा अर्थ, स्वत: किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मार्फत कोणत्याही औषधिद्रव्यांचा घाऊक वा किरकोळ विक्रीचा धंदा करणारी व्यक्ती असा आहे ;

(ख) "औषधिद्रव्य" याचा अर्थ, ज्याच्या बाबतीत कलम ३ खाली घोषणा केलेली आहे असे, 'औषधिद्रव्ये [३][आणि सौंदर्यप्रसाधने] अधिनियम, १९४०' (१९४० चा २३)-कलम ३-खंड (ख) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले कोणतेही औषधिद्रव्य असा आहे ;

(ग) "विक्रीचा देकार" यामध्ये एखाद्या व्यक्तीने विक्रीसाठी ठेवलेल्या कोणत्याही औषधिद्रव्याची तिला अपेक्षित असलेली किंमत, किंमतीची सूची प्रकाशित करून, औषधिद्रव्य हे त्याची किंमत दर्शवणाऱ्या खुणेसह विक्रीसाठी मांडून, दरपत्रक सादर करून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे सूचित करणे याचा उल्लेख समाविष्ट आहे ;

(घ) "उत्पादक" यामध्ये निर्माणकाचा समावेश आहे.

[४][(१क) १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी अजमेर किंवा भोपाळ व विन्ध्यप्रदेश किंवा कूर्ग किंवा कच्छ या भाग-क राज्यांमध्ये जी राज्यक्षेत्रे समाविष्ट होती त्यांच्या संबंधात १ नोव्हेंबर, १९५६ रोजी व तेव्हापासून, या अधिनियमातील केंद्र शासन किंवा मुख्य आयुक्त यांच्या कोणत्याही उल्लेखाचा अर्थ, प्रकरणपरत्वे, राजस्थान किंवा मध्यप्रदेश किंवा म्हैसूर किंवा मुंबई यांच्या राज्य शासनाचा उल्लेख म्हणून लावला जाईल.]

(२) एखादे औषधिद्रव्य,—

(एक) जेव्हा एका व्यक्तीच्या वतीने दुसऱ्या व्यक्तीने किंवा प्रथमोक्त व्यक्तीने उत्तरोक्त व्यक्तीच्या वतीने ताब्यात ठेवले असेल तेव्हा ;

(दोन) अन्य व्यक्तीकडे गहाण ठेवलेले असले तरीही,

ते त्या प्रथमोक्त व्यक्तीच्या कब्जात असल्याचे मानण्यात येईल.

हा अधिनियम कोणत्या औषधिद्रव्यांना लागू आहे.

३. केंद्र शासनाला [५]शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणतेही औषधिद्रव्य हे ज्याला हा अधिनियम लागू होतो असे औषधिद्रव्य म्हणून घोषित करता येईल.

औषधिद्रव्यांच्या कमाल किंमती आणि ज्या प्रमाणात ती ताब्यात ठेवता येतील किंवा विकता येतील ते प्रमाण निश्चित करणे.

४. (१) मुख्य आयुक्ताला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही औषधिद्रव्याच्या बाबतीत पुढील गोष्टी निश्चित करता येतील—

(क) व्यापाऱ्याला किंवा उत्पादकाला किती कमाल किंमत किंवा दर आकारता येईल ;

(ख) व्यापाऱ्याला किंवा उत्पादकाला कोणत्याही एका वेळी जास्तीत जास्त किती प्रमाणात ते आपल्याजवळ बाळगता येईल ;

(ग) कोणाही व्यक्तीला कोणत्याही एकाच संव्यवहारात जास्तीत जास्त किती प्रमाणात ते विकता येईल.

(२) कोणत्याही औषधिद्रव्याच्या बाबतीत या कलमाखाली निश्चित केलेल्या किंमती किंवा दर आणि प्रमाणे ही, वेगवेगळ्या स्थानिक भागांमध्ये किंवा वेगवेगळ्या वर्गांच्या व्यापाऱ्यांसाठी किंवा उत्पादकांसाठी वेगवेगळी असू शकतील.

---

१. मुंबईच्या कच्छ क्षेत्रास लागू करण्यासंबंधात हा अधिनियम 'मुंबई अधिनियम, १९६०' (१९६० चा ११) याद्वारे रद्द केला.

२. 'विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६' द्वारे "सर्व भाग ग राज्यांमध्ये" या मजकुरा-ऐवजी घातले.

३. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा—गॅझेट ऑफ इंडिया, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १२१६.

४. 'विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६' द्वारे हे कलम घातले.

५. १९६२ चा अधिनियम २१ द्वारे घातले.

**जेव्हा कलम ४ खाली कमाल मर्यादा निश्चित झालेली असेल तेव्हा विक्री, इत्यादींवरील निर्बंध.**

५. कोणताही व्यापारी किंवा उत्पादक,—

(क) कलम ४-पोटकलम (१)-खंड (क) खालील अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक किंमतीला किंवा अधिक दराने कोणतेही औषधिद्रव्य कोणत्याही व्यक्तीला विकणार नाही, विकण्याचा करार करणार नाही, विकत देऊ करणार नाही किंवा अन्यथा ते हस्तांतरित करणार नाही ;

(ख) कोणतेही औषधिद्रव्य कोणत्याही एका वेळी कलम ४-पोटकलम (१)-खंड (ख) खालील अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात स्वतःच्या कब्जात ठेवणार नाही ; किंवा

(ग) कलम ४-पोटकलम (१)-खंड (ग) खालील अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात कोणतेही औषधिद्रव्य कोणत्याही एकाच संव्यवहारात एखाद्या व्यक्तीला विकणार नाही, विकण्याचा करार करणार नाही किंवा विकत देऊ करणार नाही.

**कोणत्याही एकावेळी औषधिद्रव्य किती ठराविक प्रमाणात जवळ बाळगता येईल त्यासंबंधी सर्वसाधारण मर्यादा.**

६. (१) ज्या औषधिद्रव्याला हे कलम लागू होते असे कोणतेही औषधिद्रव्य कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही एका वेळी आपल्या वाजवी गरजांपुरते जेवढे आवश्यक असेल त्यापेक्षा जास्त प्रमाणात स्वतःच्या कब्जात बाळगता येणार नाही.

(२) हे कलम लागू करण्याच्या प्रयोजनार्थ मुख्य आयुक्त शासकीय राजपत्रात आदेश प्रकाशित करून त्याद्वारे विनिर्दिष्ट करील अशाच औषधिद्रव्यांना ते लागू होईल :

परंतु, या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, एखाद्या व्यापाऱ्याने किंवा उत्पादकाने विकलेल्या किंवा उत्पादित केलेल्या कोणत्याही औषधिद्रव्याच्या बाबतीत त्या व्यापाऱ्याला किंवा उत्पादकाला लागू होणार नाही.

**जवळ बाळगलेल्या मालाचा जादा साठा जाहीर करण्याचे कर्तव्ये.**

७. कोणतेही औषधिद्रव्ये या अधिनियमानुसार किंवा त्याखाली अनुज्ञात असेल त्यापेक्षा अधिक प्रमाणात स्वतःजवळ बाळगणारी कोणतीही व्यक्ती ताबडतोब मुख्य आयुक्ताला किंवा मुख्य आयुक्ताने या बाबतीत शक्ती प्रदान केलेल्या अन्य अधिकाऱ्याला ते वृत्त कळवील आणि त्या जादा प्रमाणातील मालाची साठवण करणे, वितरण करणे किंवा विल्हेवाट लावणे याबाबत मुख्य आयुक्त निदेश देईल त्याप्रमाणे कारवाई करील.

**विकत देण्यास नकार देणे.**

८. एखाद्या औषधिद्रव्यावर या अधिनियमाखाली कोणतीही प्रमाणाबाबतची मर्यादा घातलेली असल्यास त्या मर्यादेत ते औषधिद्रव्य कोणत्याही व्यक्तीला विकत देण्यास नकार देण्याबाबत मुख्य आयुक्ताने एखाद्या व्यापाऱ्याला किंवा उत्पादकाला आधी प्राधिकृत केलेले नसल्यास, तो पुरेशा कारणाशिवाय तसे करू शकणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, काही काळानंतर एखाद्या औषधाला जास्त किंमत येण्याची शक्यता किंवा अपेक्षा असणे हे पुरेसे कारण असल्याचे मानण्यात येणार नाही.

**विवक्षित विक्री व्यवहाराचे रोख वसुली टिप्पण द्यावयाचे.**

९. (१) कोणतेही औषधिद्रव्य रोख किंमतीला विकताना प्रत्येक विक्रेता किंवा उत्पादक हा, जर खरेदीदाराची खरेदी-किंमत पाच रुपये किंवा त्याहून अधिक असेल तर सर्व बाबतीत, आणि खरेदी-किंमत पाच रुपयांहून कमी असल्यास खरेदीदाराने तशी विनंती केलेली असेल तेव्हा, झालेल्या संव्यवहाराचा तपशील अंतर्भूत असलेले रोख वसुलीचे टिप्पण खरेदीदाराला देईल.

(२) मुख्य आयुक्ताला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा कोणत्याही रोख वसुली टिप्पणामध्ये अंतर्भूत असावयाचा तपशील विहित करता येईल.

(३) मुख्य आयुक्त शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट क्षेत्रे, व्यापारीवर्ग किंवा उत्पादकवर्ग किंवा औषधिद्रव्यांचे वर्ग यांना या कलमाच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल.

**किंमती दर्शविणे आणि किंमती व मालाचे साठे यांची सूची प्रदर्शित करणे.**

१०. (१) मुख्य आयुक्त सरसकट सर्व व्यापाऱ्यांना किंवा उत्पादकांना अथवा खासकरून एखाद्या व्यापाऱ्याला किंवा उत्पादकाला, विक्रीसाठी मांडलेल्या किंवा विकण्याचे ठरवलेल्या कोणत्याही औषधिद्रव्यावर विक्रीची किंमत दर्शवण्याचा किंवा त्या वास्तूमध्ये विक्रीसाठी बाळगलेल्या औषधिद्रव्यांच्या किंमतीची सूची व त्यांच्या कब्जात असलेल्या औषधिद्रव्यांचा साठा किती आहे ते प्रदर्शित करण्याचा निदेश देऊ शकेल आणि पूर्वोक्त अशा कोणत्याही निदेशाचे कोणत्या रीतीने पालन केले जावे त्याबाबतही निदेश देऊ शकेल.

(२) कोणताही व्यापारी औषधिद्रव्यासोबत लावलेले आणि उत्पादकाने लावलेली किंमत दर्शवणारे लेबल किंवा खूण नष्ट करणार नाही, पुसून टाकणार नाही किंवा बदलणार नाही अथवा ती नष्ट करावयास, पुसून टाकावयास किंवा बदलावयास लावणार नाही.

**संमिश्र देकाराच्या बाबतीत किंमत स्वतंत्रपणे नमूद करण्याचे आबंधन.**

११. कोणतेही औषधिद्रव्य आणि अन्य कोणताही पदार्थ यांची मिळून विक्री करण्याबाबत सरसकट एक प्रतिफल द्यावयाचे असा संव्यवहार करण्यासाठी एखादा व्यापारी किंवा उत्पादक देकार मांडील तेव्हा, ज्या व्यक्तीपुढे देकार मांडण्यात येईल तिने देकार मांडणाऱ्या व्यापाऱ्याकडे किंवा उत्पादकाकडे तशी मागणी केली तर तो आपण त्या औषधिद्रव्यासाठी किती किंमत लावली आहे ते लेखी नमूद करील, आणि ती देकार म्हणजे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ते औषधिद्रव्य याप्रमाणे नमूद केलेल्या किंमतीला विकण्याचा देकार होय असे मानण्यात येईल.

**औषधिद्रव्यांची विल्हेवाट करण्यास मनाई किंवा त्यांबाबत विनियमन.**

१२. जर मुख्य आयुक्तांच्या मते तसे करणे आवश्यक किंवा समयोचित असेल तर, तो लेखी आदेशाद्वारे,—

(क) आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेली परिस्थिती नसताना व अशा विनिर्दिष्ट शर्ती डावलून एरव्ही कोणत्याही औषधिद्रव्याची विल्हेवाट करण्यास मनाई करू शकेल ;

(ख) आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा अशा वर्गाच्या व्यापाऱ्यांना आणि अशा प्रमाणात कोणत्याही औषधिद्रव्याची विक्री करण्याचा निदेश देऊ शकेल ; आणि या कलमाखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधात त्याला आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे आणखी आदेश काढू शकेल.

**शिक्षा.**

१३. (१) जो कोणी या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील किंवा या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या प्राधिकारान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करण्यास चुकेल तो, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) या अधिनियमाखालील शिक्षापात्र गुन्ह्याबद्दल कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरवणारे न्यायालय ज्या औषधिद्रव्यांच्या साठ्याच्या संबंधात गुन्हा केला गेला असेल तो संपूर्ण साठा किंवा त्याचा कोणताही भाग जप्त करून समपहृत करावा असा आदेश देऊ शकेल.

(३) या कलमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केल्याचा दोषारोप ठेवण्यात आलेल्या व्यक्तीने, ज्या बाबतीत तिच्यावर दोषारोप केला गेला त्यासंबंधात आपण स्वतःच्या कामधंद्याच्या ओघात आपल्या नियोक्त्याच्या किंवा अन्य विनिर्दिष्ट व्यक्तीच्या सूचनेनुसार अशा अन्य व्यक्तीचा नोकर किंवा अभिकर्ता म्हणून तसे वागलो हे शाबीत करणे हा त्या व्यक्तीचा बचाव होईल.

**निगमांनी केलेले गुन्हे.**

१४. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणारा गुन्हा करणारी व्यक्ती म्हणजे एखादी कंपनी किंवा एखादा संघ किंवा निगमित असलेला वा नसलेला एखादा व्यक्तिनिकाय असेल तेव्हा, त्याचा प्रत्येक संचालक, व्यवस्थापक, सचिव, एजंट किंवा त्याच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेला अन्य अधिकारी किंवा व्यक्ती ही, तो गुन्हा आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये यासाठी आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे तिने शाबीत केले नाही तर, अशा गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल.

**प्रक्रिया.**

१५. (१) पोलीस निरीक्षकांच्या किंवा त्याहून वरच्या दर्जाचा पोलीस अधिकारी अथवा शासकीय राजपत्रातील[1] अधिसूचनेद्वारे केंद्र शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेला, पोलीस निरिक्षकांहून कमी दर्जा नसणारा असा एखादा अधिकारी याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाखालील गुन्ह्याचे अन्वेषण करता येणार नाही.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र गुन्ह्याबद्दलचा कोणताही खटला जिल्हा न्यायाधीशाच्या पूर्वमंजुरीखेरीज मांडता येणार नाही.

**झडती व अभिग्रहण करण्याच्या शक्ती.**

१६. या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्याचे अन्वेषण करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तीला ज्या जागी या अधिनियमाखालील गुन्हा घडलेला होता किंवा घडत आहे असे समजण्यास कारण असेल अशा कोणत्याही जागेची झडती घेऊन, ज्या औषधिद्रव्यांच्या साठ्याबाबत असा गुन्हा घडलेला होता किंवा घडत असेल असा कोणताही साठा तिला आपल्या कब्जात घेता येईल आणि 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) यांचे उपबंध त्या संहितेच्या कलम ९८ खाली काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये घेतलेल्या कोणत्याही झडतीस किंवा केलेल्या कोणत्याही अभिग्रहणास जसे लागू होतात तसे ते, या अधिनियमाखालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास शक्य तेथवर लागू होतील.

**नियम करण्याची शक्ती.**

१७. (१) केंद्र शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमामध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :—

(क) सरसकट सर्व व्यापारी आणि उत्पादक यांनी किंवा खासकरून एखाद्या व्यापाऱ्याने वा उत्पादकाने आपण केलेल्या खरेदी-विक्रीच्या सर्व संव्यवहारांच्या नोंदी ठेवणे ;

(ख) कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा उत्पादकाने चालवलेल्या धंद्याच्या संबंधात मागवण्यात येईल अशी सर्व माहिती सादर करणे ;

(ग) कोणत्याही व्यापाऱ्याची किंवा उत्पादकाची किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणतीही हिशेबपुस्तके किंवा अन्य दस्तऐवज यांचे निरीक्षण करणे.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

१८. या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

---

१. अशा अधिसूचनेसाठी पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९५१, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ ३२२.

अन्य कायद्यांची व्यावृत्ती. १९. या अधिनियमाचे उपबंध हे या अधिनियमामध्ये परामर्श घेतलेल्यांपैकी कोणत्याही बाबीचे विनियमन करणाऱ्या त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याच्या व्यतिरिक्त असतील, त्याला न्यूनकारी असणार नाहीत.

[1][२०. * * * * *]

---

१. [१९४९ चा अध्यादेश क्रमांक २६ चे निरसन.] 'निरसन व विशोधन अधिनियम १९५७' (१९५७ चा ३६)--कलम २ व अनुसूची १ यांद्वारे निरसित केले.

# THE DRUGS (CONTROL) ACT, 1950

# औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५०

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| amount of the purchase | खरेदी-किंमत | [S. 9(1)] |
| composite offer | संमिश्र देकार | [S. 11-m.n.] |
| dealer .. .. | व्यापारी | [S. 2(*a*)] |
| dispose of .. | हस्तांतरित करणे | [S. 5(*a*)] |
| drug .. .. | औषधिद्रव्य | [S. 2(*b*)] |
| expose for sale .. | विक्रीसाठी मांडणे | [S. 2(*c*)] |
| manufacturer .. | निर्माणक | [S. 2(*d*)] |
| offer for sale .. | विक्रीचा देकार | [S. 2(*c*)] |
| price list .. | किमतींची सूची | [S. 10(1)] |
| producer .. .. | उत्पादक | [S. 2(*d*)] |

# औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५०

# THE DRUGS (CONTROL) ACT, 1950

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| उत्पादक | producer .. .. | [क. २(च्)] |
| औषधिद्रव्य | drug .. .. | [क. २ (ख्)] |
| किमतींची सूची | price list .. .. | [क. १० (१)] |
| खरेदी-किंमत | amount of the purchase | [क. ९(१)] |
| निर्माणक | manufacturer .. | [क. २(घ्)] |
| विक्रीचा देकार | offer for sale .. | [क. २(ग्)] |
| विक्रीसाठी मांडणे | expose for sale .. | [क. २(ग्)] |
| व्यापारी | dealer .. .. | [क. २ (क्)] |
| संमिश्र देकार | composite offer .. | [क. ११-स. टी.] |
| हस्तांतरित करणे | dispose of .. .. | [क. ५(क्)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई